**नि. फौ. खटला क्र.११३/२०२२**

**निशाणी क्र.७९**

**:: अभियोग पक्षातर्फे सा.क्र.०३ चा पुरावा ::**

**शपथेवर सत्य निवेदन करतो की,**

| | | |
|---|---|---|
| **माझे नांव** | : | विजयकुमार मारोती कांबळे, |
| **वय** | : | ३८ वर्षे, **काम** : शेती, |
| **राहणार** | : | येणकी, ता. उदगीर, जि. लातूर. |

**:: अभियोग पक्षातर्फे सरतपासणी सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्रीमती पी.एस. कुलकर्णी यांचेमार्फत ::**

दयानंद माझा भाऊ आहे. मी सर्व आरोपींना ओळखतो. त्यापैकी तुळशीराम आणि वच्छलाबाई गैरहजर आहे. दि.२८/०५/२०२२ रोजी दयानंद शेतामध्ये नांगरणी करण्यासाठी ट्रॅक्टर घेऊन गेला होता. त्यावेळी सुकुमार गोविंद कांबळे आणि माणिकप्रभू भुताळे हे ईतर १० ते १२ लोकांना घेऊन शेतामध्ये मारायला गेले होते आणि दयानंदला दगडाने मारून त्याच्या जवळील २० हजार रुपये काढून घेतले. सुकुमारने चाकू काढल्याने दयानंद कसाबसा सुटून घरी आला होता. माझ्या आईने काय झाले असे विचारले असता तो सांगत असताना त्याला उलटी झाली व तो बेशुध्द पडला. त्यामुळे माझी आई व बहीण त्यांनी आरडाओरड केली. त्यामुळे अजय हरीबा भंडे आणि बिरबल मसणाजी म्हेत्रे हे घरी आले. त्यांनी दयानंदला शासकीय उदगीर येथे नेले.

०२. त्यानंतर रात्री १०.०० वाजता मी माझा भाऊ गौतमच्या घरी गेलो होतो. मी तेथे घटनेबाबत सांगत असताना माझ्या आईने व बहिणीने हाक मारली. त्यावेळी माझा भाऊ गौतम बाहेर गेला. सर्व आरोपी आमच्या घरासमोर आले आणि ''ये मादरचोद बाहेर ये, तुझ्या भावाला खपवण्यासाठी शेताकडे गेलो होतो, तुमचे तुकडे तुकडे करून जवळच्या तळ्यात बांधून टाकतो, तुम्ही दावा उचलुन घ्या'' असे म्हटले. परंतु आम्ही घराबाहेर निघालो नाही.

०३. त्यानंतर दुसऱ्या दिवशी दयानंद कांबळेने पुतणी दिक्षाला बोलावले आणि तिच्यासोबत पोलीस ठाण्यामध्ये गेला. दयानंदच्या पोटात परत दुखत असल्यामुळे तो पुन्हा सरकारी दवाखाना देवणी येथे गेला होता. त्यानंतर दयानंदने पोलीस स्टेशनला जाऊन घटनेबाबत फिर्याद दिली.

सरतपास पूर्ण.

**:: <u>आरोपी क्र.२ ते ६ व ८ ते १३ करिता उलटतपास अधिवक्ता श्री. एन.एल. मध्वरे यांच्यामार्फत</u> ::**

०४. माझे शिक्षण बॅचलर ऑफ फिशरी सायन्स मध्ये झालेले आहे. माझे आणि गौतमचे घर वेगवेगळे आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझे आणि गौतमचे शेत वेगवेगळे नाही. मी नमूद घटनेच्या वेळी शेतात हजर नव्हतो. मी त्यावेळी घरी होतो. माझे घर आणि शेत यामध्ये बरेच लांब अंतर आहे. हे म्हणणे खरे नाही की, दयानंदने घटनेबाबत खरेच सांगितले हे मी खात्रीशीर सांगू शकत नाही.

०५. हे म्हणणे खरे आहे की, माझा आणि आरोपींचा उदगीर न्यायालयामध्ये शेताबाबत वाद सुरू आहे. हे म्हणणे खरे आहे की, फेरफारच्या अनुषंगाने आमचा तहसिल कार्यालय, जिल्हाधिकारी कार्यालय व आयुक्त कार्यालय येथे वाद प्रकरणे सुरू आहेत. हे म्हणणे खरे आहे की, आमचा तात्पुरत्या मनाईहुकूमाचा अर्ज खारीज झालेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, उप–जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी आणि आयुक्त कार्यालयातील निकाल आमच्याविरुध्द लागलेले आहेत. हे म्हणणे खरे नाही की, मी दयानंदला मदत होण्यासाठी खोटी साक्ष दिली. हे म्हणणे खरे नाही की, दिवाणी प्रकरणातील निकाल विरोधात गेल्याने आरोपींवर दबाव टाकण्यासाठी खोटी केस केली. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी सविता कांबळे, वच्छलाबाई शिंदे, राजाबाई गोविंद कांबळे, रेखाबाई माणिकप्रभू भुताळे यांना चालता येत नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी सरतपासामध्ये संपूर्ण मजकूर खोटा कथन केला. हे म्हणणे खरे नाही की, मी कथन केल्याप्रमाणे कोणतीही घटना घडली नाही.

उलटतपास पूर्ण.

**:: <u>आरोपी क्र.१, ९, १४ व १५ करिता उलटतपास अधिवक्ता श्री. एम.बी. बिरादार यांच्यामार्फत</u> ::**

०६. जळबा भुताळे यांना दोन मुलं एक मुलगी आहे. त्यांची सर्वे क्र.७९/३ मध्ये ९२ आर जमीन आहे. हे म्हणणे खरे आहे की, त्यांच्या मृत्यूनंतर त्यांची पत्नी, मुलगा गोविंद व माणिक आणि मुलगी रंजना हे वारस आहेत. हे म्हणणे खरे आहे की, जळबाच्या मृत्युनंतर त्यांची नावे वारस म्हणून नोंदविलेली आहेत. साक्षीदार स्वतःहून सांगतो की, त्यांनी ते करून घेतले आहे. हे म्हणणे खरे नाही की, सदर जमीन जळबाच्या हयातीपासून

त्यांच्याच ताब्यात आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी गोविंद आणि सावित्राबाई हे घटनेच्या पूर्वीपासून अपंग आहेत. (आरोपी गोविंद न्यायालयात हजर आहे. तो अपंग असल्याचे आणि कमकुवत असल्याचे दिसून येते. सबब त्याची आणि साक्षीदाराच्या वर्तणुकीची नोंद घेतली.) हे म्हणणे खरे नाही की, आरोपी माणिकप्रभूला बेंबीचा आजार आहे. हे म्हणणे खरे नाही की, माणिकप्रभूला आजारामुळे चालता फिरता येत नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीची जमीन हडप करण्यासाठी मी खोटी साक्ष दिली.

०७. हे म्हणणे खरे नाही की, दि.२९/०५/२०२२ रोजी आम्ही सर्व लोक आरोपींच्या घरात घुसून त्यांना शिवीगाळ व मारहाण केली. हे म्हणणे खरे नाही की, मी राजाबाईचे झंपर फाडून विनयभंग केला. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही राजाबाईचे ५ ग्राम वजनाचे ६० सोन्याचे मणी आणि २ ग्राम वजनाचे २ मंगळसूत्र एकूण किंमत ३० हजार रुपये हे जबरदस्तीने चोरून नेले. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही राजाबाईला दगड फेकून मारून जिवे मारण्याची धमकी दिली आणि अश्लिल शिवीगाळ केली. हे म्हणणे खरे आहे की, राजाबाईने केलेल्या तक्रारीवरून आमच्याविरुध्द फौजदारी प्रकरण दाखल व प्रलंबित आहे.

०८. पोलिसांनी माझा जबाब नोंदविला होता. तुम्ही दावा उचलुन घ्या, आम्ही घराबाहेर निघालो नाही, हे मी पोलिसांना सांगितले होते. पोलिसांनी सदर मजकूर जबाबामध्ये का लिहिला नाही हे मी सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीची जमीन हडप करण्यासाठी भावाला पुढे केले आणि खोटी साक्ष दिली. हे म्हणणे खरे नाही की, मी सरतपासामध्ये संपूर्ण मजकूर खोटा कथन केला.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत सा.वा.दा.ख.व.ब.अ.क.केले.

( श.अ. सुरजुसे )
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, **दे व णी**.
दि.१३/०३/२०२६.

( श.अ. सुरजुसे )
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, **दे व णी**.